महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,
मा.राज्य माहिती आयोग यांच्या कार्यालयासमोर, चपराशीपुरा,अमरावती
**Government of Maharashtra**
**Tribal Development Department**
**Scheduled Tribe Certificate Scrutiny Committee Amravati.**
**Opp. State Information Commission office, Chaparashipura, Amravati.**
**Tel. No. 0721-2550991** / E-mail ID:-tcscamr.mah@nic.in

# <u>नागरिकांची सनद</u>

**प्रस्तावना**

आदिवासी विकास विभागाकडून अनुसूचित जमातीकरिता विविध प्रकारच्या योजना/सेवा उपलब्ध करुन दिल्या जातात. या योजना/सेवांची पुरेपूर माहिती सर्वसामान्य जनतेला नसते. या योजना/सेवा योग्यवेळी मिळाव्यात, त्या दर्जेदार असाव्यात, त्या वेळेवर मुदतीच्या आत प्राप्त व्हाव्यात अशी अपेक्षा असते. त्यांची गैरसोय टाळण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार नागरिकांची सनद तयार करण्यात आलेली असून त्याद्वारे जनतेला विविध योजना व सेवांची पुरेपूर माहिती व्हावी त्यामध्ये पारदर्शकता असावी व भ्रष्टाचाराला आळा घालून जनतेप्रती शासनाचे उत्तरदायित्व जोपासने व चांगली सेवा देत कायदयाची व नियमाची अंमलबजावणी करुन पारदर्शक प्रशासनाची खात्री जनतेला देण्याकरिता आदिवासी विकास विभाग, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे अंतर्गत सहआयुक्त अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी अमरावतीने वरील उदिष्टाच्या पूर्ततेकरिता नागरिकांची सनद (सिटीझन चार्टर) तयार केलेली आहे. या समितीकडून जनतेला उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या विविध सेवांचा यात समावेश आहे सदर नागरिकांची सनद मा.आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे या कार्यालयाद्वारे जाहिर केलेल्या नागरीकांच्या सनदेच्या आधारे करण्यात आली आहे.

**2) उद्दिष्टे**

अनुसूचित जमातीच्या व्यक्तीच्या जमात प्रमाणपत्राची तपासणी करणे ही सेवा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी या समितीची आहे. हे कामकाज करीत असताना या प्रक्रियेची संपूर्ण माहिती आदिवासी जनतेला देणे, प्रस्ताव प्राप्त करणे, प्रस्ताव तपासणे आणि विहीत मुदतीमध्ये प्रमाणपत्र तपासून वैध ठरविणे अथवा अवैध ठरविणे हे प्रमुख उदिष्ट या समितीचे आहे.

**३) कार्यपूर्तीचे वेळापत्रक**

महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागसवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियम) अधिनियम, 2001 व महाराष्ट्र अनुसूचित जमाती व प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनयमन) नियम 2003 मधील तरतुदीनुसार सहा महिन्यांच्या आत निर्णय घेणे अपेक्षित आहे.

तथापि, महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांचे बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडण्यास होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम 2005 मधील प्रकरण क्र. 3 च्या कलम 11 मध्ये नमूद केलेल्या न्यायप्रविष्ठ बाबी, लोक आयुक्त, उपलोक आयुक्त आणि अन्य राज्य घटनात्मक संस्था, आयोग, न्यायिकवत बाबी, केंद्र किंवा अन्य राज्य शासनाच्या संबंधातील प्रकरणे, विधी विभागांशी संबंधित बाबी, मंत्रिमंडळास सादर होणाऱ्या मुख्य धोरणात्मक बाबी इत्यादींना वेळापत्रकातून सूट राहील.

नैसर्गिक आपत्ती व कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न इत्यादी उद्‌भवल्यास या वेळापत्रकातील कार्यपूतीच्या कालावधीत वाढ होऊ शकेल, याचप्रमाणे, जमात प्रमाणपत्र पडताळणीच्या विशिष्ट प्रकरणात वेळापत्रकातील कार्यपुतीच्या कालावधीपेक्षा अधिक कालावधी व्यतित होणे अपेक्षित आहे.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम 2015 (सन 2015 चा महा. अधिनियम हमी क्र.31) मधील कलम 3 च्या उपलकलम (1) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासन दिनांक 31 डिसेंबर 2015 च्या अधिसूचनेत खालील प्रमाणे सुधारणा करीत आहे. त्यानुसार परिपूर्ण अर्ज प्राप्त झाला असल्यास तपासणी समितीकडून शालेय व गृह चौकशीसाठी दक्षता पथकाकडे पाठविण्यात आले नसेलतर 150 दिवसांत प्रकरण निकाली काढावयाचे आहे. तपासणी समितीकडून शालेय व गृह चौकशीसाठी दक्षता पथकाकडे पाठविण्यात आले असल्यास 180 दिवसांत प्रकरण निकाली काढावयाचे आहे.

तथापि, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागसवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियम) अधिनियम, 2000 (2001 चा महा.क्र.23) मधील कलम 7 (2) नुसार समितीच्या निर्णयाविरध्द मा. उच्च न्यायालयामध्ये अपील करता येत असल्यामुळे उक्त लोकसेवा ही न्यायप्रविष्ट प्रकरणांना लागू राहणार नाही.

तसेच वरील प्रमाणे विहित केलेली कालमर्यादा लक्षात घेता काही प्रकरणामध्ये अर्जदाराकडून मिळणारे सहकार्य, समितीकडे उपलब्ध असलेला कर्मचारी वर्ग, न्यायप्रविष्ट प्रकरणात प्राधान्याने करावयाची कार्यवाही याबाबीमुळे देखील विहित केलेल्या कालमर्यादित निर्णय घेणे शक्य होत नाही. त्याचप्रमाणे मा. सर्वोच्च न्यायालयाने [AIR 1994 SC 95] या प्रकरणामध्ये न्यायनिरीक्षणे नोंदवितांना अर्जदाराने त्यांना आवश्यकता भासण्याच्या सहा महिने आधीच त्यांचा प्रस्ताव तपासणी समितीकडे सादर केला पाहिजे असे नमूद केले आहे.

अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती हे एक न्यायाधिकरण असून मा. उच्च न्यायालयास दुय्यम असणारे प्राधिकरण असून उपरोक्त अधिनियमान्वये या समितीचे कामकाज चालते. उपरोक्त अधिनियमाच्या कलम 7(2) अन्वये समितीने पारीत केलेला आदेश हा अंतिम असून त्यास फक्त मा. उच्च न्यायालयातच आव्हानित करता येते.

**4) अधिनियम/नियम**

अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र पडताळणी करण्याचे कामकाज हे महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागसवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियम) अधिनियम, 2001 व महाराष्ट्र अनुसूचित जमाती प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनयमन) नियम 2003 मधील तरतुदीनुसार करण्यात येते.

तसेच वेळोवळीचे मा. सर्वोच्च न्यायालय व मा.उच्च न्यायालय यांच्याकडून विविध प्रकरणात दिलेल्या न्यायनिवाडयामध्ये नमूद असलेले न्यायनिर्देश देखील प्रमाणपत्र पडताळणी करीत असताना व निर्णय देत असताना विचारात घेतले जातात. ही माहिती महाराष्ट्र शासनाच्या विविध संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**5) तक्रारी / अपीलाचे निराकरण**

अर्जदाराचे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र पडताळणीचे कामकाज विहित मुदतीत न झाल्यास. तसेच समितीने दिलेल्या निर्णयामुळे अर्जदाराचे समाधान न झाल्यास किंवा निर्णय मान्य नसल्यास समितीच्या निर्णया विरुध्द मा.उच्च न्यायालयात दाद मागण्याची तरतूद कायदयामध्ये अंतर्भुत आहे.

अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र निर्गमित करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणपत्र देण्याचे नाकारल्यास त्यांचे आदेशाविरध्द 30 दिवसांच्या आत अनुसुचित जमाती प्रमाणपत्र पडताळीणी समितीकडे अपील करण्याची तरतूद अधिनियम व नियमात अंतर्भुत आहे. तीन महिन्याच्या कालावधीत या अपिलावर निर्णय घेणे अपेक्षित आहे.

ज्या व्यक्तीला अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्यात आले आहे. ती व्यक्ती अनुसूचित जमातीची नसल्याबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने समिती चौकशी करेल व तक्रार प्राप्त झाल्यापासून सहा महिन्याच्या आत तक्रारीच्या अनुषंगाने निर्णय घेणे अपेक्षित आहे.

**(6) नागरिकाच्या सनदेचा आढावा**

या नागरिकाच्या सनदेच्या उपयुक्ततेबाबत तथा परिणामकारकतेचा आढावा आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडून दरवर्षी माहे मे महिन्यात घेण्यात येईल व त्यात आवश्यकतेनुसार बदल करण्यात येतील

**(7) जनसामान्यांकडून सूचना**

ही नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या अवलोकनार्थ नेहमीच खुली असेल व नागरिकांच्या बहुमूल्य आणि यथोचित सूचनांचा गांभीर्यपूर्वक विचार करून त्यात वेळोवेळी सुधारणा घडवुन आणता येतील. अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीच्या अधिनस्त येणाऱ्या जमात प्रमाणपत्र तपासणी सेवा उपभोगणाऱ्या नागरिकांना आपले हक्क मांडण्यासाठी सनद नेहमीच सहकार्य करेल.

**(8) नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी**

अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती, नागरिकांच्या या सनदेची अंमलबजावणी करण्यास कटिबध्द आहे. अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती आपल्या अधिपत्याखालील सेवा कर्तव्यभावनेने व कार्यतत्परतेने उपलब्ध करून देण्याची हमी देत आहे. या सेवा पुरविताना नागरिकांना सौजन्यपूर्ण वागणूक देण्याची जबाबदारी प्रत्येक अधिकारी कर्मचाऱ्यांची राहील, अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीच्या संकेतस्थळावर नागरिकांच्या सनदेस व्यापक प्रसिध्दी देण्यात येईल.

सह आयुक्त तथा उपाध्यक्ष,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,
अमरावती

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशिल |
|---|---|
| 1 | अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती प्रशासकीय पंत्रणा |
| 2 | अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती रचना व कार्यालयीन प्रशासकीय पंत्रणा |
| 3 | अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती कडून देण्यात येणाऱ्या सेवांची यादी व सविस्तर तपशील |
| 4 | मा.राष्ट्रपती महोदयांच्या आदेशान्वये अनुसूचित जमातीची यादी |
| 5 | अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राची तपासणी नवीन संगणकीकृत ऑनलाईन प्रणालीद्वारे शासन निर्णय दि.30 एप्रिल 2016 अन्वये लागू करण्याबाबत |
| 6 | आदि प्रमाण प्रणाली वापराकरिता मार्गदर्शक पुस्तिका |
| 7 | सक्षम प्राधिकाऱ्यांनी अनुसूचित जमाती प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र विहित नमुन्यामध्ये निर्गमित करण्याबाबत शासन निर्णय 22.6.2016. (विहित नमुना क नियम 4 (6) ब 5(2) (अ) व (म)) |
| 8 | अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती कडे अर्ज करणेबाबत संभाव्य कालबध्द कार्यक्रम |
| 9 | महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, 2000 (2001 या महा.क्र.23) |
| 10 | महाराष्ट्र अनुसूचित जमाती प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीच विनियमन) नियम 2003. |
| 11 | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-2015. |
| 12 | समितीतील अधिकारी कर्मचारी यांचे कर्तव्य व जबाबदा-या |
| 13 | कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचे नाव पदनाम आणि वेतनश्रेणी |
| 14 | कार्यालयाचा पत्ता, दूरध्वनी क्रमांक, ईमेल आयडी |

**आदिवासी विकास विभागाची प्रशासकीय यंत्रणा पुढीलप्रमाणे आहे**

मा. मंत्री,

आदिवासी विकास विभाग मंत्रालय, मुंबई-32

मा. राज्यमंत्री,

आदिवासी विकास विभाग मंत्रालय, मुंबई-32

मा. प्रधान सचिव,

आदिवासी विकास विभाग मंत्रालय, मुंबई-32

आयुक्त,

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे 28, राणीचा बाग, पुणे-1

सह आयुक्त,

अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती.

सना हाऊस, राज्य माहिती आयोगाच्या कार्यालया समोर,

चपराशी पुरा, अमरावती पिन-444602

# अनुसचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती
# रचना व कार्यालयीन प्रशासकीय यंत्रणा समिती रचना

| | | | | |
|---|---|---|---|---|
| संशोधन अधिकारी तथा सदस्य (3) | वरिष्ठ संशोधन अधिकारी तथा सदस्य (2) | उपसंचालक(सं.) तथा सदस्य सचिव | सहआयुक्त तथा उपाध्यक्ष | आयुक्त तथा अध्यक्ष, आ.सं.प्र.सं. पुणे |

| | | |
|---|---|---|
| | प्रशासकीय यंत्रणा | |
| | सहआयुक्त | |
| | उपसंचालक(सं.) | |
| विधी अधिकारी | वरिष्ठ संशोधन अधिकारी | पोलीस उपअधिक्षक |
| वरिष्ठ संशोधन अधिकारी (विधी) | संशोधन अधिकारी (शिक्षण) | पोलीस निरीक्षक-3 |
| | कनिष्ठ लिपीक (शिक्षण) | |
| | संशोधन अधिकारी (निवडणूक/ तक्रार/ अपील) | |
| | कनिष्ठ लिपीक (निवडणूक) | |
| प्रबंधक | कनिष्ठ प्रशासकीय अधिकारी | |
| | कनिष्ठ लिपीक (आस्था) | |
| | कनिष्ठ लिपीक (लेखा) | |
| | कनिष्ठ लिपीक (अभिलेखागार) | |
| संशोधन सहाय्यक (रिमांड) | निम्नश्रेणी लघुलेखक-2 | पोलीस शिपाई-3 |
| संशोधन सहाय्यक (डायरेक्शन) | | |
| कनिष्ठ लिपीक (विधी) -2 | शिपाई | |

# अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती कडून देण्यात येणाऱ्या सेवांची यादी

सेवा क्र.। :- अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर नियुक्त असलेल्या किंवा नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांचे अनुसूचित जमाती प्रमाणपत्राची तपासणी करणे

सेवा क्र.2:- अनुसूचित जमातीच्या शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र तपासणी करणे,

सेवा क्र.3:- अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या किंवा निवडून आलेल्या अनुसूचित जमातीच्या उमेदवाराच्या जमातीचे प्रमाणपत्राची तपासणी करणे

सेवा क्र 4 ज्या व्यक्तीला अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्यात आले आहे ती व्यक्ती त्या जमातीचे नसल्याबाबतच्या कोणत्याही तक्रारीची किंवा अभिकथनाची चौकशी करणे

सेवा क्र.5:- अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र मिळण्याचा अर्ज सक्षम प्राधिकारी यांचेकडून फेटाळण्यात आला असेल तर अर्ज फेटाळण्याच्या आदेशाच्या तारखेपासून 30 दिवसांच्या आंत समितीकडे दाखल झालेल्या अपिलावर समिती ३ महिन्यांच्या आत निर्णय देते.

## अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती द्वारा देण्यात येणाऱ्या सेवा

**सेवा क्र.1 :- अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर नियुक्त असलेल्या किंवा नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांचे अनुसूचित जमाती प्रमाणपत्राची तपासणी करणे.**

**सेवा क्र.2:- अनुसूचित जमातीच्या शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे अनुसूचित जमाती प्रमाणपत्राची तपासणी करणे,**

**सेवा क्र.3:- अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर निवडणूक लढवू इच्छीणाऱ्या किंवा निवडून आलेल्या अनुसूचित जमातीच्या उमेदवाराच्या जमातीचे प्रमाणपत्राची तपासणी करणे**

| अ.क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| 1 | सेवा पुरविणारा अधिकारी कर्मचारी | उपसंचालक (सं) तथा सदस्य सचिव, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती |
| 2 | कायदा व नियमाच्या अंतर्गत सेवा पुरविल्या जाणार आहे. | महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागसवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियम) अधिनियम, 2002 व महाराष्ट्र अनुसूचित जमाती प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनयमन) नियम 2003.<br>सदर अधिनियम व नियम **etribevalidity. mahaonline.gov.in** या आज्ञावलीत उपलब्ध आहे |
| 3 | सेवा मिळण्यासाठी नागरिकांची | अर्जदार अनुसूचित जमातीचा असावा. अमरावती समितीच्या कार्यकक्षेतील अमरावती, अकोला व बुलढाणा, या तीन जिल्ह्यातील असावा.<br>अधिनियमतील कलम 6 (3) नुसार |
| 4 | अर्ज कुठे करावा | **etribevalidity.mahaonline.gov.in** या संगणक प्रणालीवर अर्ज उपलब्ध आहे. |
| 5 | अर्जासोबत कोणती कागदपत्रे जोडावे | **etribevalidity.mahaonline.gov.in** या संगणक प्रणालीवर अर्जाचा नमुना उपलब्ध आहे. त्यामध्ये कोणती कागदपत्रे अपलोड करावी याबाबतची सविस्तर माहिती त्याच प्रमाणे अमरावती समितीचे संकेतस्थळ **scheduledtribecertificatescrutinycommitteeamravati.in** वर सदर माहिती नमूद आहे आदि प्रमाण प्रणाली मार्गदर्शक पुस्तिकेत नमूद आहे |
| 6 | थोडक्यात कार्यपध्दती | **etribevalidity.mahaonline.gov.in** या संगणक |

| | | |
|---|---|---|
| | | प्रणालीवर अर्ज केल्यानंतर संशोधन अधिकारी यांचेकडून अर्जाची ऑनलाईन तपासणी करण्यात येते.<br>* अर्ज अयोग्य पध्दतीने भरलेला असेल किंवा अत्यावश्यक कागदपत्रे अपलोड केलेली नसल्यास काही तांत्रिक त्रुटया निदर्शनास आल्यास अर्ज ऑनलाईन प्रणालीवर नाकारल्या जातो.<br>* तपासणी अंती अर्ज योग्य असल्यास अर्जदारास मुळ प्रकरणाच्या नस्तीसह सर्व अत्यावश्यक दस्तऐवजासह समिती कार्यालयाला उपस्थित राहण्याबाबत संगणक प्रणालीद्वारे एस.एम.एस. व ई-मेल द्वारे उपस्थित राहण्याची तारीख काळविण्यात येते.<br>* अर्जदार विशीष्ठ तारखेला समिती कार्यालयाला उपस्थित झाल्यानंतर कक्ष अधिकारी यांचेकडून त्यांना टोकण देण्यात येते<br>* अर्जदाराच्या मुळ प्रकरण नस्तीची तपासणी करुन अर्ज योग्य आढळल्यास कक्ष अधिकारी त्यांचा फोटो व बोटांचे ठसे प्राप्त करतात,<br>* ज्या अर्जदारांच्या प्रकरणात त्रुटी आढळून येतात त्यांना संगणक प्रणालीद्वारे पुढील तारीख देण्यात येते.<br>* प्रकरण गुणवत्तेच्या आधारे समिती पॅनलद्वारे वैध ठरविण्यात येते किंवा पोलीस दक्षता पथकाला पाठविण्यात येते.<br>* समितीने जी प्रकरणे वेध ठरविलेली आहे त्या प्रकरणात आदेश तयार करुन रोजनाम्यासह संगणक प्रणालीवर अपलोड करण्यात येतात<br>* वरील प्रकरणे समिती सदस्यांद्वारे रिव्हीव्यू केल्यानंतर वैध ठरवून वैधता प्रमाणपत्र संगणक प्रणालीद्वारे जनरेट करण्यात येते.<br>* सदर प्रमाणपत्र टपालाद्वारे अर्जदाराच्या पत्यावर पाठविण्यात येते<br>* संगणक प्रणालीद्वारे जी प्रकरणे पोलीस दक्षता पथकाकडे चौकशीसाठी देण्यात येतात त्या प्रकरणात चौकशी अहवाल प्राप्त करून तो अर्जदाराच्या दाव्याशी सुसंगत असल्यास प्रकरण वैध केल्या जाते व अहवाल विसंगत आढळल्यास सदर अहवाल अर्जदाराला त्याचे म्हणणे सादर करण्यासाठी पाठविण्यात येतो. |

| | | |
|---|---|---|
| | | * अर्जदाराकडून पोलीस दक्षता पथकाच्या अहवालावर म्हणणे प्राप्त झाल्यानंतर अर्जदाराला त्याची बाजू मांडण्याकरीता पर्याप्त सुनावणीची संधी देवून गुणवत्तेनुसार प्रकरण निकाली काढण्यात येते. |
| 7 | अर्ज स्विकृती कालावधी | * अर्ज नमुना **etribevalidity.mahaonline.gov.in** संकेतस्थळावर बारामाही उपलब्ध आहे. |
| 8 | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल | * महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडण्यास होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम 2005 मधील प्रकरण क्र.3 च्या कलम 11 मध्ये नमूद केलेल्या व्यायप्रविष्ठ बाबी, लोक आयुक्त, उपलोक आयुक्त आणि अन्य राज्य घटनात्मक संस्था, आयोग, न्यायिकवत बाबी, केंद्र किंवा अन्य राज्य शासनाच्या संबंधातील प्रकरणे, विधी विभागांशी संबंधित बाबी, मंत्रिमंडळास सादर होणाऱ्या मुख्य धोरणात्मक बाबी इत्यादींना वेळापत्रकातून सूट राहील.<br>* ज्या अर्जाची गृहचोकशी, शालेय चौकशी व इतर चौकशी आवश्यक आहे अशा प्रकरणी अधिक कालावधी व्यतित होणे अपेक्षित राहील.<br>* महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम 2015 (सन 2015 चा महा अधिनियम हमी क्र.31) मधील कलम 3 च्या उपलकलम(I) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासन दिनांक 31 डिसेंबर 2015 च्या अधिसूचनेत खालील प्रमाणे सुधारणा करीत आहे त्यानुसार परिपूर्ण अर्ज प्राप्त झाला असल्यास तपासणी समितीकडून शालेय व गृह चौकशीसाठी दक्षता पथकाकडे पाठविण्यात आले नसेल तर 150 दिवसांत प्रकरण निकाली काढावयाचे आहे. तपासणी समितीकडून शालेय व गृह चौकशीसाठी दक्षता पथकाकडे पाठविण्यात आले असल्यास 180 दिवसांत प्रकरण निकाली काढावयाचे आहे.<br>* तथापि, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागसवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियम) अधिनियम, 2000 (2001 चा महा. क्र.23) मधील कलम 7 (2) नुसार समितीच्या निर्णयाविरूद मा. उच्च न्यायालयामध्ये |

| | | |
|---|---|---|
| | | अपील करता येत असल्यामुळे उक्त लोकसेवा ही न्यायप्रविष्ट प्रकरणांना लागू राहणार नाही.<br>* तसेच वरील प्रमाणे विहित केलेली कालमर्यादा लक्षात घेता काही प्रकरणामध्ये अर्जदाराकडून मिळणारे सहकार्य समितीकडे उपलब्ध असलेला कर्मचारी वर्ग, न्यायप्रविष्ट प्रकरणात प्राधान्याने करावयाची कार्यवाही याबाबीमुळे देखील विहित केलेल्या कालमर्यादित निर्णय घेणे शक्य होत नाही त्याचप्रमाणे मा. सर्वोच्च न्यायालयाने AIR 1994 SC 95] या प्रकरणामध्ये न्यायनिरीक्षणे नोदवितांना अर्जदाराने त्यांना आवश्यकता भासण्याच्या सहा महिने आधीच त्यांचा प्रस्ताव तपासणी समितीकडे सादर केला पाहिजे असे नमूद केले आहे. |
| 9 | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करावयाचे त्या अधिका-याचे नाव व पदनाम व कार्यालयाचे नाव | उपसंचालक (सं.) तथा सदस्य सचिव, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती. |
| 10 | प्रथम अपीलीय अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | सहआयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती. |
| 11 | द्वितीय अपिलीय अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | आयुक्त तथा अध्यक्ष आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे |

**सेवा क्र.4 :- ज्या व्यक्तीला अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्यात आले आहे ती व्यक्ती त्या जमातीची नसल्याबाबतच्या कोणत्याही तक्रारीची किंवा अभिकथनाची चौकशी करणे**

| अ.क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| 1 | सेवा पुरविणारा अधिकारी /कर्मचारी | उपसंचालक (सं) तथा सदस्य सचिव अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती |
| 2 | कायदा व नियमाच्या अंतर्गत सेवा पुरविल्या जाणार आहे. | महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागसवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियम) अधिनियम, 2002 व महाराष्ट्र अनुसूचित जमाती प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनयमन) नियम 2003.<br>सदर अधिनियमातील कलम 7 मधील (1)(2)(3) नुसार कार्यवाही करण्यात येते. |
| 3 | सेवा मिळण्यासाठी नागरिकांची पात्रता | तक्रारकर्ता हा अमरावती समितीच्या कार्यकक्षेतील अमरावती, अकोला, बुलडाणा या तीन जिल्हयातील असावा.<br>अधिनियमातील कलम 6(3) नुसार |
| 4 | अर्ज कुठे करावा | सहआयुक्त, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती |
| 5 | अर्जासोबत कोणती कागदपत्रे जोडावी. | तक्रारीच्या अनुषंगाने आवश्यक ते सर्व पुरावे जोडणे अपेक्षित आहे. |
| 6 | थोडक्यात कार्यपध्दती | * प्राप्त अर्ज अवलोकन करुन समिती गैरतक्रारदाराच्या आक्षेपीत अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या अनुषंगाने पुरावे मागविल.<br>* आवश्यकतेनुरुप सक्षम प्राधिका-याने गैरतक्रारदाराला निर्गमित केलेल्या अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राची प्रकरण नस्ती मागविल.<br>* आवश्यकतेनुरुप गैरतक्रार दाराच्या आक्षेपीत प्रमाणपत्राच्या अनुषंगाने तक्रारदाराने दिलेले पुरावे लक्षात घेवून पोलीस दक्षता पथकामार्फत चौकशी करेल.<br>* तपासणी व चौकशी दरम्यान तक्रारदार व गैरतक्रारदार यांना बाजू मांडण्याकरीता नैसर्गिक न्याय तत्वानुसार सुनावणीची संधी देण्यात येवून सदर प्रकरणात गुणवत्तेनुसार निर्णय घेण्यात येतो व तसे आदेश पारीत करण्यात येतात. |

| | | |
|---|---|---|
| 7 | अर्ज स्विकृत्ती कालावधी | बाराही महिने |
| 8 | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल. | * अधिनियमानुसार 6 महिने<br>* तथापि, महाराष्ट्र शासकीय कर्मचायांचे बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडण्यास होणाऱ्या विलास प्रतिबंध अधिनियम 2005 मधील प्रकरण क्र. 3 च्या कलम ।। मध्ये नमूद केलेल्या न्यायप्रविष्ठ बाबी, लोक आयुक्त, उपलोक आयुक्त आणि अन्य राज्य घटनात्मक संस्था आयोग न्यायिकवत बाबी केंद्र किंवा अन्य राज्य शासनाच्या संबंधातील प्रकरणे, विधी विभागांशी संबंधित बाबी, मंत्रिमंडळास सादर होणा-या मुख्य धोरणात्मक बाबी इत्यादीना वेळापत्रकातून सूट राहील<br>* ज्या अर्जांची गृहचौकशी, शालेय चौकशी व इतर चौकशी आवश्यक आहे अशा प्रकरणी अधिक कालावधी व्यतित होणे अपेक्षित राहील<br>* महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम 2015 (सन 2015 चा महा. अधिनियम हमी क 31) मधील कलम 3 च्या उपकलम (1) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासन दिनांक 31 डिसेंबर 2015 च्या अधिसूचनेत खालील प्रमाणे सुधारणा करीत आहे.त्यानुसार परिपूर्ण अर्ज प्राप्त झाला असल्यास तपासणी समितीकडून शालेय व गृह चौकशीसाठी दक्षता पथकाकडे पाठविण्यात आले नसेल तर 150 दिवसांत प्रकरण निकाली काढावयाचे आहे. तपासणी समितीकडून शालेय व गृह चौकशीसाठी प्रकरण दक्षता पथकाकडे पाठविण्यात आले असल्यास 180 दिवसांत प्रकरण निकाली काढावयाचे आहे.<br>* तथापि महाराष्ट्र अनुसूचित जाती अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागसवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियम) अधिनियम, 2000(2001 या महा क्र.23)मधील कलम-7(2) नुसार समितीच्या निर्णया विरुध्द मा. उच्च न्यायालयामध्ये अपील करता येत असल्यामुळे उक्त लोकसेवा हो न्यायाविष्ट प्रकरणांना लागू राहणार नाही<br>* तसेच वरील प्रमाणे विहित केलेली कालमर्यादा लक्षात |

| | | |
|---|---|---|
| | | घेता की प्रकरणामध्ये अर्जदाराकडून मिळणारे सहकार्य समितीकडे उपलब्ध असलेला कर्मचारी वर्ग, न्यायप्रविष्ट प्रकरणात प्राधान्याने कराबयाची कार्यवाही याबाबीमुळे देखील विहित केलेल्या कालमर्यादेत निर्णय घेणे शक्य होत नाही. त्याचप्रमाणे मा. सर्वोच्च न्यायालयाने [AIR 1994 SC 95] या प्रकरणामध्ये न्यायनिरीक्षणे नोरवितांना अर्जदाराने त्यांना आवश्यकता भासण्याच्या सहा महिने आधीच त्यांचा प्रस्ताव तपासणी समितीकडे सादर केला पाहिजे असे नमूद केले आहे. |
| 9 | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करावयाचे त्या अधिकाऱ्याचे नाव व पदनाम व कार्यालयाचे नाव | उपसंचालक तथा सदस्य सचिव, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती |
| 10 | प्रथम अपीलीय अधिका-याचे नाव व पदनाम | सहआयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती. |
| 11 | द्वितीय अपिलीय अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | आयुक्त तथा अध्यक्ष, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे |

सेवा क्र.5:- अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र मिळण्याचा अर्ज सक्षम प्राधिकारी यांचेकडून फेटाळण्यात आला असेल तर अर्ज फेटाळण्याच्या आदेशाच्या तारखेपासून तीस दिवसाच्या आत समितीकडे अपिल दाखल करणे.

| अ.क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| 1 | सेवा पुरविणारा अधिकारी /कर्मचारी | उपसंचालक (सं) तथा सदस्य सचिव अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती |
| 2 | कायदा व नियमाच्या अंतर्गत सेवा पुरविल्या जाणार आहे. | महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागसवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियम) अधिनियम, 2002 व महाराष्ट्र अनुसूचित जमाती प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनयमन) नियम 2003.<br>सदर अधिनियमातील कलम 7 मधील (1)(2)(3) नुसार कार्यवाही करण्यात येते. |
| 3 | सेवा मिळण्यासाठी नागरिकांची पात्रता | तक्रारकर्ता हा अमरावती समितीच्या कार्यकक्षेतील अमरावती, अकोला, बुलडाणा या तीन जिल्हयातील असावा.<br>अधिनियमातील कलम 6(3) नुसार |
| 4 | अर्ज कुठे करावा | सहआयुक्त, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती कार्यालयात |
| 5 | अर्जासोबत कोणती कागदपत्रे जोडावी. | अपिलाच्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व कागदपत्रे व पुरावे जी जात प्रमाणपत्र मिळण्यासाठी सक्षमप्राधिकारी यांचेकडे अर्ज करतांना दाखल केलेली होती तीच कागदपत्रे जोडावीत. |
| 6 | थोडक्यात कार्यपध्दती | * प्राप्त अपिलाचे अवलोकन करुन अपिल कत्यांस त्याचे दाव्यापृष्ठर्थ कागदपत्र व पुरावे सादर करण्यास कळविणे,<br>* आवश्यकतेनुरुप ज्या सक्षम प्राधिकाऱ्याने अपिलकर्त्यांचा अर्ज फेटाळलेला आहे त्या प्राधिकाऱ्याकडून अर्जदाराने सादर केलेल्या प्रकरणातील दस्तऐवन मागविणे<br>* अपिलकर्याला व अर्ज फेटाळणाऱ्या प्राधिकरणाला नैसर्गिक न्याय तत्यानुसार सुनावणी देवून बाजू मांडण्याची पूर्ण संधी देण्यात येवून सदर प्रकरणात निर्णय घेण्यात येतो व तसे आदेश पारित करण्यात येतात. |
| 7 | अर्ज स्विकृत्ती कालावधी | बाराही महिने |
| 8 | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता | * अधिनियमानुसार 3 महिने |

| | | |
|---|---|---|
| | केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल. | * तथापि, महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांचे बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडण्यास होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम 2005 मधील प्रकरण क्र. 3 च्या कलम ।। मध्ये नमूद केलेल्या न्यायाविष्ठ बाबी, लोक आयुक्त, उपलोक आयुक्त आणि अन्य राज्य घटनात्मक संस्था, आयोग, न्याविकवत बाबी, केंद्र किंवा अन्य राज्य शासनाच्या संबंधातील प्रकरणे, विधी विभागांशी संबंधित यावी, मंत्रिमंडळास सादर होणाऱ्या मुख्य धोरणात्मक बाबी इत्यादींना वेळापत्रकातून सूट राहील.<br>* तथापि, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागसवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियम) अधिनियम, 2000(2001 चा महा.क्र.23) मधील कलम 7 (2) नुसार समितीच्या निर्णयाविरुध्द मा. उच्च न्यायालयामध्ये अपील करता येत असल्यामुळे उक्त लोकसेवा हो न्यायप्रविष्ट प्रकरणांना लागू राहणार नाही.<br>* तसेच वरील प्रमाणे विहित केलेली कालमर्यादा लक्षात घेता काही प्रकरणामध्ये अर्जदाराकडून मिळणारे सहकार्य, समितीकडे उपलब्ध असलेला कर्मचारी वर्ग, न्यायप्रविष्ट प्रकरणात प्राधान्याने करावयाची कार्यवाही केलेल्या कालमर्यादित निर्णय घेणे याबाबीमुळे देखील विहित शक्य होत नाही. त्याचप्रमाणे मा. सर्वोच्च न्यायालयाने [AIR 1994 SC 95] या प्रकरणामध्ये न्यायनिरीक्षणे नोदवितांना अर्जदाराने त्यांना आवश्यकता भासण्याच्या सहा महिने आधीच त्यांचा प्रस्ताव तपासणी समितीकडे सादर केला पाहिजे असे नमूद केले आहे. |
| 9 | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करावयाचे त्या अधिकाऱ्याचे नाव व पदनाम व कार्यालयाचे नाव | उपसंचालक तथा सदस्य सचिव, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती |
| 10 | प्रथम अपीलीय अधिका-याचे नाव व पदनाम | सहआयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती. |
| 11 | द्वितीय अपिलीय अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | आयुक्त तथा अध्यक्ष, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे |

# अनुसूचित जमातीची यादी

## LIST OF SCHEDULED TRIBES IN MAHARASHTRA

**The Scheduled Castes and Scheduled Tribes Orders (Amendment) Act 1976 ( Act No. 108 of 1976)**
**The Scheduled Castes and Scheduled Tribes Orders (Amendment) Act 2002 (Act No. 10 of 2003)**

1 Andh
2 Baiga
3 Barda
4 Bavacha, Bamcha
5 Bhaina
6 Bharia Bhumia, Bhuinhar Bhumia Pando
7 Bhattra
8 Bhil, Bhil Garasia, Dholi Bhil, Dungri Bhil, Dungri Garasia, Mewasi Bhil, Rawal Bhil, Tadvi Bhil, Bhagalia Bhilala, Pawra, Vasava, Vasave
9 Bhunjia
10 Binjhwar
11 Birhul, Birhor
12 Omitted ( By The Scheduled Castes and Scheduled Tribes Orders (Amendment) Act 2002 No. 10 of 2003, dated 7th January, 2003
13 Dhanka, Tadvi, Tetaria, Valvi
14 Dhanwar
15 Dhodia
16 Dubla, Talavia, Halpati
17 Gamit, Gamta, Gavit, Mavchi, Padvi
18 Gond, Rajgond, Arakh, Arrakh, Agaria, Asur, Badi Maria, Bada Maria, Bhatola, Bhimma, Bhuta, Kollabhuta, Kollabhuti, Bhar, Bisonhorn Maria, Chota Maria, Dandami Maria, Dhuru, Dhurwa, Dhoba, Dhulia, Dorla, gaiki, Gatta, Gatti, Gaita, Gond Gowari, Hill Maria, Kandra, Kalanga, Khatola, Koitar, Koya, Khirwar, Khirwara, Kucha Maria, Kuchaki Maria, Madia, Maria, Mana, Mannewar, Moghya, Mogia, Monghya, Mudia, Muria, Nagarchi, Naikpod, Nagwanshi, Ojha, Raj, Sonjhari Jhareka, Thatia, Thotya, Wade Maria, Vade Maria
19 Halba, Halbi
20 Kamar
21 Kathodi, Katkari, Dhor Kathodi, Dhor Kathkari, Son Kathodi, Son Katkari
22 Kawar, Kanwar, Kaur, Cherwa, Rathia, Tanwar, Chattri.
23 Khairwar
24 Kharia
25 Kokna, Kokni, Kukna
26 Kol
27 Kolam, Mannervarlu
28 Koli Dhor, Tokre Koli, Kolcha, Kolgha
29 Koli Mahadev, Dongar Koli
30 Koli Malhar
31 Kondh, Khond, Kandh
32 Korku, Bopchi, Mouasi, Nihal, Nahul,Bondhi, Bondeya
33 Koya, Bhine Koya, Rajkoya
34 Nagesia, Nagasia
35 Naikda, Nayaka, Cholivala Nayaka, Kapadia Nayaka, Mota Nayaka, Nana Nayaka
36 Oraon, Dhangad
37 Pardhan, Pathari, Saroti
38 Pardhi, Advichincher, Phans Pardhi, Phanse Pardhi, Langoli Pardhi, Bahelia, Bahellia, Chita Pardhi, Shikari, Takankar, Takia
39 Parja
40 Patelia
41 Pomla
42 Rathawa
43 Sawar, Sawara
44 Thakur, Thakar, Ka Thakur, Ka Thakar, Ma Thakur, Ma Thakar
45 Omitted ( By The Scheduled Castes and Scheduled Tribes Orders (Amendment) Act 2002 No. 10 of 2003, dated 7th January, 2003
46 Varli
47 Vitolia, Kotwalia, Barodia

टिप:- तहसिलदार, उपविभागीय अधिकारी वा तत्सम सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेल्या अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्रात नमूद जमातीचे शब्दलेखन (स्पेलिंग) उपरोक्त यादीप्रमाणेच असणे बंधनकारक आहे याची कृपया अर्जदाराने नोंद घ्यावी. त्या प्रमाणे शब्दलेखन नसलेले अर्ज तपासणीस पात्र ठरत नाहीत.

## अनुसूचित जमाती प्रमाणपत्रा तपासणी समिती करीता अर्ज सादरीकरण कालबध्द कार्यक्रम

| अ.क्र. | तपशील | अर्ज सादरीकरण कालावधी | समितीने छाननी करणे व निर्णय देणेबाबत कालावधी |
|---|---|---|---|
| 1 | अनुसूचित जमातीच्या शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी.<br>अ) वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयीन विद्यार्थी<br>ब) इ.10 वी चा निकाल लागल्यानंतर इ.11वी विज्ञान शाखेत प्रवेशीत विद्यार्थी व<br>क) इ.12 वी चा निकाल लागल्यानंतर डी. टी.एड./ समकक्ष अभ्यासक्रम बी.एड समकक्ष व्यावसायिक आणि पदवीधरांनी व्यावसायिक अभ्यासक्रम यासाठी अर्ज सादर केल्यानंतर<br>**(मागील लगतच्या शैक्षणिक वर्षात शिकत असलेल्या महाविद्यालयाचे शिफारस व (क) मधील अभ्यासक्रमासाठी सादर केलेल्या अर्जाची पोहोच पावती या दोन्ही कागदपत्रां-समवेत)**<br>ड) कला, वाणिज्य (बिगर व्यावसायिक अभ्यास-क्रमांचे विद्याथी) | बाराही महीने | अनुक्रमणीका तपशील तीन नुसार |
| 2 | अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर नियुक्त असलेल्या किंवा नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांचे अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी. | बाराही महीने | अनुक्रमणीका तपशील तीन नुसार |
| 3 | अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर निवडणूक लढवू इच्छीणाऱ्या किया निवडून आलेल्या अनुसूचित जमातीच्या उमेदवाराच्या जमातीचे प्रमाणपत्र तपासणी. | निवडणूक कार्यक्रम जाहिर होण्याच्या ६ महिने अगोदर | अनुक्रमणीका तपशील तीन नुसार |
| 4 | ज्या व्यक्तीला अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्यात आले आहे तो व्यक्ती त्या जमातीचे नसल्याबाबतच्या कोणत्याही तक्रारीची किंवा अभिकथनाची चौकशी करणे, | बाराही महीने | अनुक्रमणीका तपशील तीन नुसार |
| 5 | अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र मिळण्याचा अर्ज सक्षम प्राधिकारी यांचेकडून फेटाळण्यात आला असेल तर अर्ज फेटाळण्याच्या आदेशाच्या तारखेपासून तीस दिवसाच्या आत समितीकडे अपिल दाखल करणे. | बाराही महीने | अनुक्रमणीका तपशील तीन नुसार |